ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख ३० डिसेंबर, १९५३ अंक ४९

## विविध माहिती

**डांग प्रदेशाचा विकास**—मुंबई सरकारनें डांग प्रदेशाच्या विकासासाठीं चालू आर्थिक वर्षांत १,८०,००० रुपयांच्या रकमेची तरतूद केली आहे, असें समजतें. ह्या रकमेपैकीं ४८,००० रुपये पाट-बंधाऱ्यांच्या आठ योजना आणि गांवांतून पिण्याच्या पाण्याच्या विहिरी बांधण्यासाठीं खर्च करण्यांत यावयाचे आहेत.

**आसामला रिझर्व्ह बँकेची मदत**—आसाम को-ऑपरेटिव्ह अपेक्स बँक ह्या संस्थेला रिझर्व्ह बँकेनें २० लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. ह्या कर्जाची हमी राज्य सरकारनें घेतली आहे. प्राथमिक सहकारी पतपेढ्यांना शेतीच्या हंगामाच्या वेळीं अल्प मुदतीचीं कर्जें देण्यासाठीं वरील रकमेचा विनियोग करण्यांत येईल.

**कच्च्या फिल्मचा कारखाना**—म्हैसूर सरकारनें मध्यवर्ती सरकारला अशी विनंति केली आहे कीं, राज्य सरकार काढणार असलेल्या कच्च्या फिल्मच्या कारखान्याचा अंतर्भाव पंचवार्षिक योजनेंत करण्यांत यावा आणि त्यासाठीं १ कोटी रुपयांची मदतही देण्यांत यावी.

**रशिआसाठीं भारताचा चहा**—रशिआ आणि भारत ह्यांच्यांत नुकत्याच झालेल्या व्यापारी कराराप्रमाणें भारताकडून रशिआला १९५३–५४ सालांत २ कोटी पौंड चहाचा पुरवठा करण्यांत येईल, असा अंदाज आहे. रशिआकडून भारताला मिळणाऱ्या मालांत लक्षांत घेण्यासारखी वाढ झाल्यास आणखीहि चहा रशिआला पुरविण्यांत येण्याचा संभव आहे.'

**भारतामधील साखरेचा खप**—१९५२–५३ सालांत भारतामध्यें एकूण १६.७ लाख टन साखर खपली, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**लंडनमध्यें बुद्धाचें देऊळ**—लंडनच्या केन्‌सिंगटन भागांत सीलोनी लोकांनीं बुद्धाचें देऊळ बांधण्याचें ठरविलें आहे असें समजतें. लंडनमधील बुद्धधर्मीय सीलोनी लोकांची संख्या सुमारें १,००० आहे. गौतम बुद्धाला ज्या झाडाखालीं ज्ञानप्राप्ति झाली त्या झाडाची एक फांदी सध्यां सीलोनमधील बुद्ध भिक्षू जोपासत आहेत. ही फांदी वरील देवळांत लावण्यांत येणार आहे. शिवाय सीलोनमधून बुद्धाची एक मूर्तीहि धाडण्यांत येणार आहे.

**हातमागाच्या धंद्याला मदत**—१९५३–५४ सालीं त्रावणकोर-कोचीनमधील हातमागाच्या धंद्याचा विकास करण्यासाठीं भारतीय सरकारनें ४,७५,००० रुपये मंजूर केले आहेत. हातमागाच्या कापडाच्या विक्रीला मदत करणें, सहकारी संस्थांना भांडवल पुरवणें, हातमागांत नवीन प्रकारचे धोटे बसविणें, इत्यादि कामासाठीं रकम खर्च करण्यांत येणार आहे.

**रशिआच्या मच्छीमारीच्या बोटी**—रशिआच्या १५ मच्छीमारी बोटींचा एक काफला सुएझ कालव्यांतून नुकताच व्हॅलाव्हिडोस्टॉक ह्या अतिपूर्वेकडील बंदराकडे रवाना झाला. चालू वर्षीं रशिअन मच्छिमारी बोटी कालव्यांतून जाण्याचा हा दुसरा प्रसंग आहे. बोटींवरील ३६५ खलाशांना बंदरांत उतरण्याची खास परवानगी देण्यांत आली होती.

**मेणबत्तीप्रमाणें जळणारा मासा**—अमेरिकेच्या उत्तर पॅसिफिक समुद्रांत एक प्रकारचा मासा सांपडतो. रेड इंडिअन लोक ह्या माशाचा उपयोग खाण्यासाठीं आणि प्रकाश मिळविण्यासाठीं करतात. हा मासा वाळल्यावर त्याच्या पोटांतून एक वात घालण्यांत येते. वातीला काडी लावल्याबरोबर तो मेणबत्तीसारखा जळूं लागतो व प्रकाश देतो.

**मद्रास राज्यांतील विक्री कर**—विक्रीकरांमधून कोणत्या वस्तू वगळण्यांत याव्या आणि कोणत्या वस्तूंवर कमी दरानें कर आकारण्यांत यावा ह्याची चौकशी करण्यासाठीं मद्रास सरकार एक कमिटी नेमणार आहे. ज्या वस्तू फार काळ टिकण्यासारख्या नसतात त्यांच्यावरील कर सवलतीच्या दरानें पूर्वीपासूनच आकारण्यांत येत आहे.

**३०० वर्षांपूर्वींच्या मूर्ती**—नेपाळमध्यें कांतिपूर ह्या ठिकाणीं प्राचीन शिल्पकलेचे उत्तम नमुने सांपडतात. काटमांडू येथील पदार्थ-संग्रहालयांत ठेवण्यासाठीं विष्णु, गणेश आणि दुर्गा ह्या तीन देवतांच्या ३०० वर्षांपूर्वींच्या मूर्ती कांतिपूर येथून नेपाळ सरकारनें मिळविल्या आहेत. त्याशिवाय ५०० वर्षांपूर्वींची बुद्धधर्मीय देवतांचीं कांहीं तैलचित्रेंहि मिळविण्यांत आलीं आहेत.

**वृत्तपत्राचा २५० वा वाढदिवस**—ऑस्ट्रिआची राजधानी व्हिएन्ना येथें प्रसिद्ध होणाऱ्या ‘वायनर झीटुंग’ नांवाच्या वृत्तपत्रानें आपल्या २५० व्या वाढदिवसानिमित्त १५० पानांची आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध केली. हें पत्र सन १७०३ पासून सतत प्रसिद्ध होत आहे असें सांगण्यांत येतें. ऑस्ट्रिया दुसऱ्या महायुद्धांत जर्मन सैन्यानें व्यापला, तेवढ्या १९३८–४५ पर्यंतच्या कालांतच काय तें बंद होतें.

**भारताच्या अनुबोधपटला बक्षीस**—शेती-विषयक चित्रपटांचा एक महोत्सव रोम येथें नुकताच साजरा करण्यांत आला. महोत्सवांत ३८ देशांनीं भाग घेतला होता आणि एकूण ३५६ अनुबोधपट त्यांत दाखविण्यांत आले. भारतीय सरकारच्या चित्रपट खात्यानें ‘संपत्तीचें झाड’ ह्या नांवाचा एक अनुबोधपट तयार केला होता. त्याला चांदीचा बिल्ला देण्यांत आला. अनुबोधपट नारळाच्या झाडाविषयीं होता.

### भूदान यज्ञाची प्रगति

नोव्हेंबर १९५३ अखेरपर्यंत १,२५,३४३ दात्यांनी एकूण २३,४४,४८३ एकरांचें भूदान दिलें आहे. प्रत्येक प्रदेशांत पुढील प्रमाणें भूदान मिळालें आहे:—

| प्रदेश | एकर |
|---|---|
| १ बिहार | १२,९५,४६० |
| २ उत्तर प्रदेश | ५,००,३३१ |
| ३ राजस्थान | २,२९,७७० |
| ४ हैद्राबाद | ६८,७६८ |
| ५ मध्यप्रदेश | ५८,६२८ |
| ६ मध्य-भारत | ५४,४३८ |
| ७ उत्कल | ४५,०२१ |
| ८ गुजरात | १८,३९६ |
| ९ तामिलनाड | १४,२५२ |
| १० आंध्र | १०,२९९ |
| ११ केरळ | १०,००० |
| १२ महाराष्ट्र | ९,५६४ |
| १३ सौराष्ट्र | ८,००० |
| १४ दिल्ली | ७,६५९ |
| १५ विंध्यप्रदेश | ३,९६२ |
| १६ पंजाब | ३०,०३५ |
| १७ म्हैसूर | २,१९२ |
| १८ कर्नाटक | १,६३४ |
| १९ हिमाचल प्रदेश | १,३५० |
| २० बंगाल | ३७४ |

### टेलिव्हिजनची व सिनेमाची स्पर्धा

मास्को येथील सिनेमा आर्ट इन्स्टिट्यूटचे चालक प्रो. अलेक्झांड्राफ ह्यांनीं लंडनच्या 'डेली मेल' मध्यें एक लेख लिहून रशिआंत टेलिव्हिजन आणि सिनेमा ह्यांच्यांत स्पर्धा कशी उद्भवत नाहीं त्याचें विवेचन केलें आहे. ते म्हणतात कीं, सध्यां अमेरिकेंत हॉलिवुडमधील चित्र-निर्मात्यांपुढें ही स्पर्धा चिंतेचा विषय म्हणून उभी आहे. रशिआंत टेलिव्हिजन आणि चित्रगृहें ह्यांच्यांत व्यापारी स्पर्धा नसल्यामुळें एकच चित्रपट टेलिव्हिजनच्या पडद्यावर व रजतपटावर एकाच वेळीं दाखविला जातो. त्यामुळें एक फायदा असा होतो कीं, सिनेमाच्या रसिकांना चित्रपटाच्या गुणदोषांविषयीं आधींच मत बनवितां येतें आणि तो त्यांना आवडल्यास सिनेमागृहाच्या मोठ्या पडद्यावर तो पुन्हा पहाण्यासाठीं निर्णय घेतां येतो. रशिआंतील टेलिव्हिजनच्या प्रसारासंबंधीं माहिती देतांना त्यांनीं सांगितलें कीं, रशिआंत फक्त मास्को व लेनिनग्रॅडसारख्या फार मोठ्या शहरींच टेलिव्हिजनचा प्रसार झाला आहे, असें नव्हे. बहुतेक मोठ्या शहरांतून आतां टेलिव्हिजनची व्यवस्था सुरू झाली आहे. स्वतःच्या मालकीचे टेलिव्हिजन सेट्स असलेलीं लक्षावधि कुटुंबें आहेत, पण ज्यांना तितकीं ऐपत नाहीं त्यांच्यासाठीं खास टेलिव्हिजन-चित्रगृहें बांधण्यांत येत आहेत. रशिआंत लोकरंजन करणारे उत्तम कलाकार नट आहेत. पण त्यांना हॉलिवुडमधील 'ताऱ्या' सारखे लठ्ठ पगार देण्यांत येत नाहींत. एका रात्रींत अचानक उगवणारे असे 'तारे' ते नाहींत. आपल्या कलेचें पुष्कळ काळ शिक्षण घेतलेले आणि अनुभव असलेले असे ते जनतेचे कलाकार आहेत. आपल्या अंगच्या गुणामुळें जे कीर्तिमान् होतात त्यांनाच 'जनतेचे कलाकार' अशी पदवी देण्यांत येते.

**पूर्व-पाकिस्तानांत कागदाचा कारखाना**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या तांत्रिक साह्य-संस्थेचा फायदा घेऊन पूर्व-पाकिस्तानांत वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार असल्याचें समजतें. पूर्व-पाकिस्तानांत सांपडणाऱ्या मऊ लांकडाचा उपयोग करून कागद बनविण्यांत येणार आहे. तांत्रिक सल्ला एक स्विस तज्ज्ञ देणार आहे.

**पडीक जमिनीची लागवड**—हैद्राबाद राज्याला तुंगभद्रा धरणाचें पाणी मिळूं लागल्यामुळें बरीच पडीक जमीन लागवडीखालीं आणतां येण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. राज्य-सरकारनें ह्या कामासाठीं मध्यवर्ती सरकारकडे ७० लाख रुपयांची मदत मागितली आहे. योजनेच्या पहिल्या अवस्थेंत १५,००० एकर जमीन लागवडीस योग्य केली जाईल असें समजतें.

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी !!

दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुरअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७
हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

दि
बँक ऑफ महाराष्ट्र लि.
मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

—भांडवल—
वसूल झालेलें भांडवल :: रु. सोळा लक्ष
रिझर्व्ह व इतर फंड :: रु. सहा लक्ष, सोळा हजार
एकूण खेळतें भांडवल ::
रु. तीन कोटी, पन्नास लक्षांचे वर

संचालक मंडळ
श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) — श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे — श्री. न. ग. पवार
श्री. मा. रा. जोशी — श्री. फ. दो. पद्मजी
श्री. मा. वी. शहा — श्री. शं. ल. किर्लोस्कर
श्री. भा. म. गुप्ते

बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्सचा अगत्य फायदा घ्या.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ३० डिसेंबर १९५३





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनच्या कामकाजाची चौकशी

### समितीचा अहवाल : सरकारचा अभिप्राय

इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनच्या कामकाजाची चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी अर्थमंत्र्यांनीं लोकसभेंत १७ डिसेंबर, १९५२ रोजीं दिलेल्या आश्वासनानुसार भारत सरकारनें लोकसभेच्या सदस्य, श्रीमती सुचेता कृपलानी, यांचे अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली होती. समितीच्या पुढील कामाचे विषय खालीलप्रमाणें होते :—

(१) लोकसभेंत इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन (दुरुस्ती) विधेयकाच्या चर्चेच्या वेळीं कॉर्पोरेशनवर वशिलेबाजीबाबत केलेले आरोप लक्षांत घेऊन तिच्या कर्जव्यवहाराची छाननी करणें.

(२) कर्जें मंजूर करतांना योग्य काळजी घेतली जाते किंवा कसें, याबाबत तपासणी करणें.

(३) कॉर्पोरेशननें सदरहु कायद्याचीं उद्दिष्टें आणि सरकारनें दिलेल्या सूचना यांची योग्य ती दखल घेऊन कर्जमंजुरीबाबत अवलंबिलेल्या धोरणाचें पुनर्विलोकन करणें, आणि,

(४) जरूर पडल्यास कॉर्पोरेशनच्या व्यवहारांत सुधारणा करण्यासाठी शिफारसी करणें.

### वशिलेबाजीचा आरोप

इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन चौकशी समितीच्या शिफारशी व निष्कर्ष याबाबत सरकारनें घेतलेले निर्णय अंतर्भूत असणारा भारत सरकारचा ठराव लोकसभेंत उप-अर्थमंत्री श्री. ए. सी. गुह यांनीं दि. २३ डिसेंबर रोजीं सादर केला. कॉर्पोरेशनविरुद्ध लांचबाजीचे व वशिलेबाजीचे करण्यांत आलेले आरोप सिद्ध झाले नसल्याबद्दलचें समितीचें मत सरकारला मान्य असल्याचें ठरावांत म्हटलें आहे. या निश्चित स्वरूपाच्या आरोपांतून चौकशीसमितीनें कॉर्पोरेशनला मुक्त केलें असलें तरी कांहीं बाबतींत तिनें प्रतिकूल मत व्यक्त केलें आहे. अध्यक्ष किंवा इतर संचालक लक्ष घालतील त्या अर्जांचा अधिक जलद व सवलतीनें विचार करण्यांत येतो आणि कोणाहि बड्या उद्योगपतींचा संबंध आहे अशा प्रतिष्ठित कारखान्यांच्या बाजूनें कॉर्पोरेशनचें मत झुकतें अशासारखें समितीनें मत व्यक्त केलें आहे. कांहीं प्रकरणांच्या केलेल्या चौकशींत, त्या त्या प्रकरणीं कांहींसा उदारपणा किंवा पक्षपात दाखविण्यांत आला असल्याचें सूचित करणारीं कांहीं विधानें समितीनें केलेलीं आहेत. यांपैकी प्रत्येक प्रकरणाची सरकारनें अत्यंत काळजीपूर्वक तपासणी केली असून, व्यवहाराच्या दृष्टीनें योग्य नसलेल्या कांहीं सौम्य अटी किंवा मोठीं कर्जें या अर्थानें उदार वागणूक म्हणण्यांत आलेल्या समितीच्या मतांचा स्वीकार करणें कठीण असल्याचें सरकारचें मत आहे.

### संचालकांचा हितसंबंध

(१) संपूर्ण वेळ काम करणारा पगारी अध्यक्ष असावा ही चौकशीसमितीची सूचना सरकारनें तत्त्वतः मान्य केली आहे. यासाठी कायद्यांत दुरुस्ती करावी लागेल.

(२) समितीनें सुचविल्याप्रमाणें दिल्लीखेरीज इतर महत्त्वाच्या केंद्रांत कॉर्पोरेशनच्या बोर्डाच्या बैठकी अधूनमधून भराव्यात हें सरकारला मान्य आहे. शाखाकचेऱ्यांसाठी प्रादेशिक सल्लागारांच्या समितीबाबतच्या चौकशी समितीच्या सूचनेचा देखील काळजीपूर्वक विचार करण्यांत आला, आणि कॉर्पोरेशन ही एक कर्ज देणारी विशेष प्रकारची आर्थिक संस्था आहे ही गोष्ट लक्षांत घेतां, प्रादेशिक पायापेक्षा कामाच्या दृष्टीनें कॉर्पोरेशनला सल्ला मिळावा हें सरकारला इष्ट वाटत असल्याचें ठरावांत दिग्दर्शित केलें आहे. उद्योगधंद्यांबाबत योग्य तो सल्ला मिळण्याचे दृष्टीनें कॉर्पोरेशननें यापूर्वीच एक कापड सल्लागार समिति नेमली असून, निरनिराळ्या धंदेगटांसाठी अशा कामकाजात्मक समित्या नेमण्याचा ती विचार करीत आहे.

(३) कॉर्पोरेशनच्या एखाद्या संचालकाचा, कर्जासाठी अर्ज केलेल्या औद्योगिक कारखान्यांत हितसंबंध असेल तर त्यानें कर्ज मिळण्यांत आपला कोणता हितसंबंध आहे तें उघड करावें, ही समितीनें केलेली शिफारस सरकारनें स्वीकारली आहे. इतकेंच नव्हे, कॉर्पोरेशननें ही सूचना स्वीकारल्याचें या ठरावांत निदर्शनास आणण्यांत आलें आहे. अशा संचालकाचा हितसंबंध असलेल्या कर्जाच्या अर्जावर चर्चा चालू असतांना त्यानें बैठकींत भाग घेऊं नये ही गोष्टहि सरकारला मान्य आहे.

इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनचा एखादा संचालक जर एखाद्या कंपनीचा मॅनेजिंग डायरेक्टर, डायरेक्टर, भागीदार असेल तर त्या कंपनीस कर्ज देऊं नये या समितीनें केलेल्या सूचनेवर ठरावांत पुढील मत व्यक्त केलें आहेः—

“ सध्यां या कॉर्पोरेशनचें जवळजवळ ६० टक्के भाग भांडवल बँका, विमा कंपन्या, सहकारी बँका यांनीं दिलें असून, त्यांना मॅनेजिंग व डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर वगळून बोर्डावरील १२ संचालकांपैकीं ६ संचालक निवडून देण्याचा अधिकार आहे. हे संचालक अर्ज करणाऱ्या कांहीं कंपन्यांचे मॅनेजिंग डायरेक्टर, पार्टनर, शेअर होल्डर असण्याची शक्यता आहे. अशा कंपन्यांना कर्जास अपात्र ठरविणें त्यांस अडचणीचें होईल; इतकेंच नव्हे तर कॉर्पोरेशनचें स्वरूप आणि रचना संपूर्ण बदलीपर्यंत तें व्यवहार्यहि होणार नाहीं. तथापि, कर्जासाठी केलेले असे अर्ज संपूर्ण बोर्डापुढें ठेवण्यासाठी राखून ठेवावेत ही गोष्ट कॉर्पोरेशननें मान्य केली आहे. बोर्डावर असलेल्या दोन सरकारी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळें अशा प्रकरणीं अधिक सुरक्षितता प्राप्त होईल. कॉर्पोरेशनचा एखादा डायरेक्टर जिचा मॅनेजिंग डायरेक्टर, अगर डायरेक्टर-पार्टनर अगर भागीदार आहे अशा कंपनीसाठीं कर्ज मंजूर झालें तर अशीं सर्व प्रकरणें कॉर्पोरेशननें सरकारला कळविण्याची सूचना करण्याचें सरकारनें सुचविलें आहे. ”

### कॉर्पोरेशननें पाळावयाचीं तत्त्वें

(४) कॉर्पोरेशननें पाळावयाच्या तत्त्वासंबंधीं सरकारनें

मार्गदर्शन करावें या समितीनें केलेल्या सूचनेसंबंधीं ठरावांत असें म्हटलें आहे कीं, औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रांत इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन हा एक नवा प्रयोग असून प्रत्यक्ष अनुभवावरून तत्त्वें स्वीकारण्यांत येऊन पद्धति पाडण्यांत याव्यात. त्याशिवाय कॉर्पोरेशनच्या बोर्डावर डायरेक्टर म्हणून दोन वरिष्ठ सरकारी अधिकारी आहेत आणि कॉर्पोरेशन व सरकारी खातीं व इतर सरकारी यंत्रणा यांत निकटवर्ती संबंध आहे. या कारणास्तव १९४८ मधील एक प्रसंग वगळल्यास कॉर्पोरेशनला सूचना देण्याचा आतांपर्यंत प्रसंग आलेला नाहीं. आतां आलेल्या अनुभवावरून आणि चौकशीसमितीच्या शिफारशींनुसार सरकार कॉर्पोरेशनला या ठरावांत घातलेल्या निर्णयांसह सूचना देईल.

(५) ५० लाख रुपयांहून अधिक कर्जाबाबत सरकारकडे विचारणा करावी, या समितीनें केलेल्या सूचनेबाबत ठरावांत असें म्हटलें आहे कीं, एकाच प्रकरणीं ५० लाख रुपयांहून अधिक कर्ज देण्याचा कॉर्पोरेशनचा अधिकार नुकत्याच म्हणजे १९५२ मध्यें केलेल्या एका कायद्यानुसार वाढवला आहे. त्यानंतर एकाच कारखान्यानें ५० लाखांवर कर्ज मागण्याचा प्रसंग आलेला नाहीं. त्यामुळें सध्यांच्या परिस्थितींत बदल करून ५० लाखांवर कर्जासाठीं केलेले अर्ज मंजुरीसाठीं आपलेकडे पाठविण्याचा अधिकार आपणांस प्राप्त करून घेणें सरकारला तेवढें न्याय्य वाटत नाहीं. तथापि, अशा प्रकारच्या सर्व कर्जासंबंधीं सरकारला कळविण्यांत यावें ही गोष्ट सरकारला मान्य आहे.

### लायक संचालकांचें महत्त्व

" दिलेल्या कर्जाचें वाजवी तारण आणि औद्योगिक विकास घडवून आणण्याचें कर्तव्य ह्यांचा योग्य मेळ घालण्याचें अवघड काम इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशनला करावें लागतें, आणि तिचा व्यवस्थापक वर्ग व संचालक मंडळ ह्यांच्या लायकीवरच त्या कामाचा दर्जा अवलंबून राहील हें उघड आहे. कॉर्पोरेशनच्या संचालकमंडळाचे सदस्य हे मोठी जबाबदारी घेऊन व्यवसाय करणारे महत्त्वाचे गृहस्थ आहेत; त्यांतील कांहीं प्रमुख उद्योगपती आहेत, कांहीं बँकर व विमाव्यवसायी आहेत, कांहीं सरकारी अधिकारी आहेत. स्वतःचा मूल्यवान् वेळ खर्च करून ते कॉर्पोरेशनच्या कामांत दक्षतेनें लक्ष घालीत आहेत, आणि त्यांच्या मदतीचा अतिशय मोठा उपयोग होत आहे. कर्जमंजुरी किंवा नामंजुरी ह्या दोन्ही बाबतींत आतांपर्यंतचे सर्व ठराव एकमतानें झालेले आहेत." कॉर्पोरेशनच्या संचालकमंडळाचे अध्यक्ष सर श्रीराम, ह्यांनीं मंडळाविषयीं व्यक्त केलेले हे विचार मननीय आहेत. एकाद्या संचालकाचें कर्ज मागणाऱ्या कंपनींत हितसंबंध असतील, तर त्या कंपनीस कर्ज देऊं नये ही चौकशीसमितीची शिफारस अव्यवहार्य आहे, आणि ती अंमलांत आणली तर कॉर्पोरेशन कित्येक तज्ज्ञांच्या अनुभवी सल्ल्यास मुकेल, हें उघड आहे. तथापि त्याबाबत योग्य ती दक्षता घेतली जावी, हें रास्त आहे. बँकिंग कंपनीच्या बाबतींत ह्यासंबंधांत जो कायदा आहे, तोच इं. फि. कॉर्पोरेशनच्या बाबतींत लागू केला जाणें अगत्याचें आहे. आजपर्यंत तशी प्रथा तरी राखली जावयास हवी होती, असें चौकशीकमिटीच्या अहवालावरून दिसून येतें.


किफायतशीर व खात्रीदायक धंद्यास

**— भागीदार पाहिजे —**

चौकशीः—C/o वृ. रा. कुलकर्णी, अर्थप्रतिनिधि.
९६ नारायण, पुणें २.


### झेकोस्लोव्हाकिआला अशुद्ध लोखंडाचा पुरवठा

मद्रास बंदरांत ' मायकेल कुटुझाव्ह ' ही रशिअन बोट १० तारखेस आली होती. बोटीनें ८,८५९ टन लोखंडाची माती भरून घेतली आणि ती १७ तारखेस एडनकडे रवाना झाली. ही रशिअन बोट झेकोस्लोव्हाकिआनें भाड्यानें घेतली असून लोखंडाची माती झेकोस्लोव्हाकिआला पुरविण्यांत येणार असल्याचें समजतें. मद्रास बंदरांतून नेलेल्या मातीच्या किंमतीचे सालवार आंकडे असे आहेत. १९५०-५१ सालीं २२ लाख रुपयांची माती नेण्यात आली. १९५१-५२ सालीं १ कोटी रुपये किंमतीची माती नेण्यात आली, आणि १९५२-५३ सालीं ३·१७ कोटी रुपये किंमतीची निर्यात करण्यांत आली. वजन टनाप्रमाणें हे आंकडे पुढीलप्रमाणें आहेत १९५०-५१ सालीं ८४,००० टन; १९५१-५१ सालीं २,८०,००० टन आणि १९५२-५३ सालीं ८,११,००० टन. १९५१ च्या एप्रिल ते जुलैपर्यंत मद्रास बंदरांतून २,८५,००० टन माती निर्यात करण्यांत आली व तिची किंमत १·२८ कोटी रुपये झाली. १९५२ सालीं ह्याच कालावधींत २,१२,००० टन माती निर्यात करण्यांत आली होती आणि तिची किंमत ९४ लाख रुपये झाली होती. १९५१ सालच्या ह्याच कालावधींत फक्त ५४,००० टन माती निर्यात करण्यांत आली होती व तिची किंमत अवघी १७ लाख रुपये भरली होती. मद्रास बंदरांतून परदेशीं जाणाऱ्या लोखंडाच्या मातीच्या निर्यातींत सालोसाल वाढ होत आहे असें दिसून येतें. ह्या मातीचा देशांत उपयोग करतां येण्यासारखा नसल्यानें ती परदेशीं पाठवून परदेशी हुंडणावळ मिळविणें योग्यच समजलें पाहिजे.


# दि बेळगांव बँक, लि.

स्थापना १९३० शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

प्रमुख ठिकाणीं बँकेच्या २२ शाखा आहेत.

बँकेचे सर्व तऱ्हेचे व्यवहार माफक दरानें केले जातात.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. १,९०,००० |
| ठेवी | रु. ८८,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ९५,००,००० चे वर |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या इमारतींत

सेफ डिपॉझिट व्हाल्टची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या जयसिंगपूर शाखेचें उद्घाटन १-१-१९५४ रोजीं श्रीमान् शेठ देवचंद छगनलाल शहा (M. L. C.) यांचे हस्तें होणार आहे.

बँकेचें संचालक मंडळ

१ श्री. जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन

२ श्री. एल. व्ही. देशपांडे, व्हाइस चेअरमन

३ श्री. ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर

४ श्री. जी. व्ही. सराफ ८ श्री. जी. एन्. कुलकर्णी

५ श्री. एम्. जी. हेरेकर ९ श्री. एस्. एम्. मुन्तूर

६ श्री. बी. बी. पोतदार १० श्री. जे. डब्ल्यू. कलघटगी

७ श्री. एन्. एस्. शिराळी ११ श्री. एच्. एम्. जमादार

एच. एस. कुलकर्णी, B. A., मॅनेजर.

## हातमाग धंद्याच्या विकास योजनांस खर्चाची मंजुरी

देशांतील हातमाग धंद्याच्या विकासाकरितां १९५३–५४ च्या आर्थिक वर्षासाठीं राखून ठेवण्यांत आलेल्या ४ कोटी रुपयांपैकीं भारत सरकारनें गेल्या तीन महिन्यांत राज्य सरकारांनीं सादर केलेल्या जवळजवळ २१५ लाख रु. खर्चाच्या हातमाग धंद्याच्या विकासाच्या अनेक योजनांस मंजुरी दिली आहे. ही रक्कम राज्य सरकारांच्या स्वाधीन करण्यांत आली आहे. आणखी सुमारे ४५ लाख रु. खर्चाच्या अशा योजनांवर मध्यवर्ती सरकार विचार करीत असून त्यांस थोड्याच दिवसांत मंजुरी मिळण्याची अपेक्षा आहे.

सदर योजनांसाठी मंजूर झालेली रक्कम मुख्यतः सहकारी व सरकारी भांडारांतील हातमागाच्या कापडाची विक्री करून आलेल्या पैशावर रिबेट देणें, विणकर सहकारी संस्थांच्या खेळत्या व भाग भांडवलासाठीं कर्ज देऊन भक्कम पायावर विणकर संघटनें उभारणें यासाठी खर्च होईल.

### हातमाग-धंद्याची विपन्नावस्था

सध्यांच्या अ. भा. हातमाग मंडळाची स्थापना भारत सरकारनें नोव्हेंबर १९५२ मध्यें केली. तत्पूर्वी कांहीं महिने बाजारपेठेंत मंदी आल्यानें विणकरांकडे व विणकरांच्या सहकारी संस्थांकडे हातमागी कापडाचे बरेच साठे पडून राहिले होते. विणकरांना पोट भरणें कठीण जात होतें आणि त्यांतील अनेकांस आपला व्यवसाय बंद करावा लागला होता. नवीन मंडळाची पुनर्घटना करतांना भारत सरकारला असें वाटलें, कीं विणकरांच्या विकट परिस्थितीस प्रामुख्यानें हातमाग धंद्याच्या सुसूत्र संघटनेचा आणि हातमागाच्या कापडाच्या विक्रीसाठी पुरेशा सवलतींचा अभाव कारणीभूत आहे. अखिल भारतीय हातमाग मंडळानें राज्य सरकारांनीं सादर केलेल्या हातमाग विकासाच्या विविध योजनांवर तपशीलवार विचार करून व १८ राज्यांच्या १३७ योजनांची सरकारला शिफारस केली. नोव्हेंबर १९५३ अखेरपर्यंत भारत सरकारनें ११ राज्यांकडून आलेल्या एकूण ६७ योजनांस संमति देऊन कर्ज आणि साह्य म्हणून २१५ लक्ष रु. मंजूर केले होते. सध्यां सरकारपुढें १४ राज्यांतून आलेल्या ७० योजना विचारार्थ आहेत. तसेंच, हातमाग मंडळ १० योजनांची तपासणी करीत असून अजून सात 'ब' आणि 'क' वर्गीय राज्यांकडून अद्यापि योजना सादर व्हावयाच्या आहेत.

असंघटित स्वरूपांतील बहुसंख्य विणकरांना सहकारी संस्थेंत दाखल करून घेऊन त्यांनीं तयार केलेल्या कापडाच्या विक्रीची व्यवस्था केल्यास, विणकरांना रास्त जीवनवेतन मिळण्याची निश्चिती करून देणें अवघड नसल्याबद्दल सदरहू मंडळाची खात्री आहे. पुढील पांच वर्षांच्या कालावधींत बऱ्याच विणकरांना सहकारी संस्थांत दाखल करतां येईल अशी आशा मंडळास वाटते. अशा विणकरांना हातमाग धंद्याच्या विकासासाठीं राखून ठेवलेल्या रकमेपैकीं बरीच रक्कम देतां येईल.

मंडळ स्वतः चालविणार असलेल्या दोन योजनांसाठी भारत सरकारकडून मंजुरी मिळविण्यांत आली आहे. पहिली योजना अंतर्गत विक्रीची आहे. मद्रास येथें केंद्र कचेरी असलेली मध्यवर्ती बाजारपेठ संघटना यापूर्वीच स्थापन झाली असून, मद्रास, मुंबई, नागपूर, ग्वाल्हेर, बनारस आणि कलकत्ता येथें तिच्या शाखा उघडण्यांत येतील. ही संघटना हातमागी कापडाच्या बाजारपेठेचा अभ्यास, ग्राहकांच्या गरजा धंदेवाइयास कळविणें, उत्पादनाचा






दर्जा राखणें व या कापडाबद्दल प्रसिद्धी व प्रचार करणें, हीं कामें करील.

दुसरी योजना म्हटली म्हणजे देशाबाहेरील विक्रीची सदर योजनेनुसार सिंगापूर, रंगून, कोलंबो व बगदाद या ठिकाणीं हातमागी कापड बाजारपेठ अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत येणार असून, अनेक देशांत या कापडाची विक्री करण्यासाठी भांडारें उघडण्यांत यावयाचीं आहेत. चालू बाजारपेठांचा विकास करणें व अशा कापडासाठीं नव्या बाजारपेठा शोधून काढणें हें या अधिकाऱ्यांचें मुख्य काम असेल. या अधिकाऱ्यांची निवड झाली असून लवकरच ते आपलीं अधिकारसूत्रें हातीं घेण्याची अपेक्षा आहे.

### निर्यातीस वाव

देशांतील मागणीस चालना देण्यानेंच या विक्रीचा प्रश्न सुटेल ही गोष्ट मंडळाला मान्य असली तरी योग्य संघटना व प्रचार झाल्यास भारत प्रतिवर्षी १ ते १॥ कोटी वार हातमागी कापड सहज निर्यात करूं शकेल, असें मंडळास वाटतें. यंदाच ऑक्टोबर १९५३ पर्यंत सुमारें २७० लक्ष वार कापड निर्यात झालें असून आणखी सुमारें १४० लक्ष वार कापड निर्यात होईल अशी अपेक्षा आहे.

एकेकाळीं भारतीय हातमागी कापड लोकप्रिय असलेले कांहीं देश आतां आपल्या शेतकरी वर्गास जोडधंदा मिळण्याचें दृष्टीनें आपल्या देशांतील अशा धंद्याचा साहजिकपणेंच विकास करीत आहेत. तथापि आपल्या देशांतील हा धंदा अनेक शतकांतून मिळविलेल्या कौशल्यावर आधारलेला असल्यानें इतर ठिकाणीं विकास होत असलेले नवे हातमाग धंदे त्याच्याशीं स्पर्धा करूं शकणार नाहींत. तसेंच शोधून काढतां येण्यासारख्या नव्या बाजारपेठाहि आहेतच.

भारतीय हातमाग धंदा संघटना आणि तांत्रिक सुधारणेद्वारा भारताच्या आर्थिक घडींत आपलें योग्य तें स्थान पटकावील याची अ. भा. हातमाग मंडळास खात्री आहे.

---

**जबलपूर कॉर्पोरेशनला कर्ज**—जबलपूर म्युनिसिपालिटीच्या पाणीपुरवठ्याच्या योजनेसाठीं २५ लाख रुपयांचें कर्ज देण्याचें एका विमा-कंपनीनें कबूल केल्याचें समजतें. कॉर्पोरेशनचे मेयर श्री. तिवारी ह्यांनीं राज्य सरकारकडे कर्ज उभारण्याची परवानगी मागितली होती, ती आतां मिळाली आहे.

**हंगेरीमधील मुलांची आगगाडी**—हंगेरीमध्यें फक्त मुलांनीं चालविलेली अशी एक रेल्वे आहे. गाडीचा ड्रायव्हरच फक्त मोठा माणूस असतो. जीं शाळकरी मुलें शाळेंत प्रगति-दाखवितील अगर तरुणांच्या कृत्यामधून चांगलें काम करतील, त्यांनाच ह्या रेल्वेची सफर बाक्षिस म्हणून करून देण्यांत येते.

### कण आणि क्षण

( लेखक व प्रकाशक श्री. श्री. वा. काळे, पृष्ठें १६८ किंमत अडीच रुपये. ) पुस्तकाच्या नांवावरून त्यांतील विषयाचा बोध होणार नाहीं. कुटुंबांत व समाजांत सुख वाढण्यासाठी कसे वागावे याचा विचार या पुस्तकांतील तीस लेखांतून केलेला आहे. 'सुखी जीवनाच्या पाऊलवाटांचे मार्गदर्शन करतांना लेखकानें शहरांतील पांढरपेशा वर्गाचे सांसारिक व सामाजिक जीवन मुख्यत्वें विचारांत घेतलेलें आहे. हे लेख मुख्यत्वें स्त्रीवर्गास मार्गदर्शन करण्यासाठी लिहिले गेले आहेत. स्त्रीचें कुटुंबांतील महत्त्वाचें स्थान, घरगुती नोकरांचा प्रश्न, मिळवत्या स्त्रीच्या अडचणी, नर्सिंग व्यवसायाचें महत्त्व, सांसारिक खरेदी, गृहिणीची संसारदक्षता वगैरे अनेक प्रश्नांवर छोट्या छोट्या लेखांतून लेखकानें रोजच्या व्यवहारांतील अनेक उदाहरणें सांगून सूचना दिल्या आहेत, त्या सर्वांस पटण्यासारख्याच आहेत. 'प्रवासाची पूर्वतयारी' प्रकरणांत राणी एलिझाबेथनें ( ती राजकन्या असतांना ) आफ्रिका, सिलोन, ऑस्ट्रेलियाचा दौरा कसा आंखला होता याची तपशीलवार माहिती दिली आहे. ती विषयास सोडून नसली तरी सामान्य कुटुंबांतील व्यक्तींना प्रवासासंबंधीं सूचना देतांना ही माहिती अस्थानीं आहेसे वाटतें. 'तुमची कौटुंबिक राहणी तपासून पहा' या प्रकरणांत आपल्या सुधारणेस किती वाव आहे हें वाचकांना स्वतः पडताळून पहातां यावें यासाठी ५० प्रश्न दिले आहेत. तेवढें वाचले तरी आपण बेफिकिरीपणानें रोजच्या व्यवहारांत कशा चुका करतो व त्यामुळें कुटुंबियांच्या सुखांत कसा बाध आणीत असतो हे समजून येतें. या पुस्तकांतील लेख वेळोवेळीं निरनिराळ्या मासिकांसाठी लिहिलेले असल्यानें बऱ्याच लेखांत त्याच त्या विधानांची 'पुनरुक्ति' झालेली आहे. तसेच सर्व लेखांत एकसूत्रता आणणेंहि शक्य झालेलें नाहीं. तथापि प्रत्येक सांसारिक स्त्री-पुरुषास वरपांगी बारीकसारीक वाटणाऱ्या पण परिणामी महत्त्वाच्या गोष्टींचें मार्गदर्शन करणारें हें 'गाईड' आहे.

( "सकाळ" ) १३-१२-५३

**जपान-रशिआ व्यापार**—जपानचा परदेशांशीं चालणारा व्यापार वाढविण्याच्या दृष्टीनें जपानी व्यापारी रशियाशीं व्यापार करण्याच्या शक्यतेचा विचार करूं लागले आहेत. रशिआकडून कापूस आणि लांकूड मिळविण्याचा त्यांचा बेत आहे. युक्रेनमधील कापूस चांगल्या प्रतीचा असल्यानें कांहीं जपानी कंपन्या तो आयात करण्याच्या खटपटींत आहेत.

**बिहारमधील उद्योगधंद्यांचा चित्रपट**—भारतीय सरकारच्या चित्रपट खात्यानें बिहारमधील उद्योगधंद्यांची माहिती देणारा एक चित्रपट नुकताच तयार केला आहे. चित्रपटांत राज्यांतील खनिज उद्योगधंद्यांची आणि ग्रामोद्योगांची माहिती ग्रथित करण्यांत आली आहे. सिंद्री येथील खतांच्या कारखान्याचेंहि चित्रीकरण करण्यांत आलें आहे.


दि
युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सींच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.



दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.


एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.



किर्लोस्कर

पॉवरवर चालणारे





"शरद चरक"

उसाचे चरक.

वसंत नं. ३ चरक

हंगाम नजीक आला !

—सविस्तर माहितीसाठी आजच लिहा.—

किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी, (जि. द. सातारा)

## किर्लोस्कर बंधु लि०, किर्लोस्करवाडी

### ३१ जुलै, १९५३ अखेरचा वार्षिक अहवाल

वरील कंपनीला ४,५०,३११ रु. घसारा काढून १०,६८,५५९ रु. ठोक नफा झाला. म्हैसूर किर्लोस्कर लि., हरिहरकडून मॅनेजिंग एजन्सी कमिशन व ऑफिस अलावन्स मिळून ५८,०३२ रु. मिळाले. सर्व खर्च वजा जातां व कराची तरतूद करून ९१,८८६ रु. निव्वळ नफा राहिला. भागीदारांना ४% डिव्हिडंड देण्याचें ठरलें. कंपनीनें दिलेल्या बोनस शेअर्ससकट सर्व भांडवलावर ह्या दरानें डिव्हिडंड दिलें जाणार आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

इंजिनिअरिंग धंद्यांतील मंदी आणि महाराष्ट्रांतील व दक्षिण भारतांतील दुष्काळ, ह्यांमुळें कंपनीच्या मालास नेहेमीपेक्षा कमी मागणी आली. त्यामुळें उत्पादन आखडतें घेणें भाग पडलें. चालू वर्षी पाऊस समाधानकारक झाला असल्यामुळें पुढील काळ आशादायक वाटतो. तथापि, निश्चित अंदाज करतां येण्याजोगी अद्याप परिस्थिति नाहीं.

कंपनीनें गेल्या वर्षासाठी ४% डिव्हिडंड दिलें असलें, तरी पूर्वीच्या २७ वर्षांच्या डिव्हिडंडची सरासरी ७·१४% पडते आणि कंपनीचा ताळेबंद तिची मजबुती, उत्पादनक्षमता आणि सिद्धता दर्शवितो. कंपनीच्या जिंदगीचा घसारा पूर्णपणें काढून यंत्रसामुग्री अद्ययावत् राखण्याचें चालकांचें धोरण प्रथमपासूनच असल्यानें, अनुकूल परिस्थितीचा कंपनीस तात्काळ फायदा मिळूं शकतो व प्रतिकूल परिस्थितीस ती तोंड देऊं शकते. त्यामुळें, कंपनीच्या कारभारांत सातत्य राहूं शकतें. ह्या आदर्श व्यवस्थेबद्दल किर्लोस्कर आणि कं. चें अभिनंदन केलें पाहिजे.

#### ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २२,९९,१४२ | जमीन, इमारती | १५,४०,६९५ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ३७,७८,८८९ | मशिनरी | ३४,५७,३७३ |
| करांची व इतर | | वॉटर वर्क्स | ३,१६,७८८ |
| तरतूद | ३६,०५,८५५ | इलेक्ट्रिक | |
| घसारा फंड | ४२,८७,८६७ | इन्स्टालेशन | २,१९,७४३ |
| ठेवी, इ. | ९,२८,६७८ | कच्चा माल, | |
| इतर देणीं | ८,७०,१९० | स्पेअर पार्ट्स | ३६,६५,३७२ |
| | | स्टॉक-इन-ट्रेड | १९,८७,९११ |
| | | येणीं | ७,३३,५०२ |
| | | ॲडव्हान्सेस | १७,४५,८७१ |
| | | इनव्हस्टमेंट | ११,५२,४०६ |
| | | बँकांत | ४,९६,७९१ |

---

### अनाथ विद्यार्थी गृहाची महाराष्ट्र रोजनिशी आणि दिनदर्शिका

पुणें अ. वि. गृहाची महाराष्ट्र रोजनिशी आणि दिनदर्शिका आमचेकडे भेट म्हणून आली आहे, तीं दोन्हीं नेहेमीप्रमाणें उपयुक्त आहेत. हुशार व गरीब विद्यार्थ्यांचें पालन-पोषण व शिक्षण करणाऱ्या ह्या संस्थेस सर्वांनीं यथाशक्ति मदत करणें योग्य होईल. संस्थेतून बाहेर पडणारे कितीतरी विद्यार्थी महाराष्ट्राच्या उद्धारासाठी हातभार लावतात, ही बाबहि महत्त्वाची आहे.

### आसाममधील तागाचा धंदा

भारत सरकारनें नेमलेल्या ज्यूट इन्क्वायरी कमिशननें आसामचा दौरा पुरा केला असून आतां तें बिहारच्या दौऱ्यावर गेलें आहे. श्री. के. पी. एस्. अय्यंगार हे कमिशनचे अध्यक्ष आहेत. शिलाँग सोडण्यापूर्वी त्यांनीं आसामचे मुख्य मंत्री, मुख्य चिटणीस आणि डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ह्यांच्याशीं आसाममध्यें एक तागाची गिरणी काढण्याबद्दल चर्चा केल्याचें समजतें. आसाम सरकारचें म्हणणें असें आहे कीं, अशी एक गिरणी राज्यांत काढण्यांत यावी. ही गिरणी स्थापन झाल्यानें तागाच्या धंद्याला दर मणामागें जे १० रुपये खर्च करावे लागतात तें वांचतील असें राज्य-सरकारचें म्हणणें आहे. दर मणामागें ही जी रक्कम खर्च होते ती मुख्यतः तागाची वहातूक आणि दलालांची अडत ह्यावर खर्च होते. ह्याशिवाय राज्य सरकारचें असेंहि म्हणणें आहे कीं मध्यवर्ती सरकारनें व राज्य सरकारनें आर्थिक मदत देऊन तागाच्या सांठवणीसाठी गुदामें बांधावी, तागाच्या शेतकऱ्यांचा सहकारी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन द्यावें आणि बोट कंपन्यांना तागाच्या वहातुकीसाठी सवलतीचे दर जाहीर करण्यास सांगावें. आसाममधील तागाच्या धंद्याला साह्य करण्याच्या दृष्टीनें ह्या प्रश्नाचा विचार करूं, असें आश्वासन कमिशननें दिल्याचें समजतें. आसामची फाळणी होण्यापूर्वी एकूण १,५०,००० एकर जमिनींत तागाची लागवड होत असे; अलीकडे ही लागवड ३,००,००० एकर जमिनींत करण्यांत येते. आसाममधील शेतकी खात्यानें केलेल्या सतत प्रयत्नांचाच हा परिणाम आहे. आसाममधील ताग हा भारतांत पैदा होणाऱ्या उत्तम तागाच्या तोडीचा असल्याची कमिशनची खात्री पटवून देण्यांत आली. सध्या हा धंदा जरा अडचणींत सांपडला असल्यानें त्याला मदत करणें योग्य असल्याचें कमिशनचें मत आहे.

### मुंबई राज्यांतील मॅंगेनीझच्या खाणी

मुंबई राज्यांत कारवार जिल्ह्यांत मॅंगेनीझ या धातूच्या खाणी आहेत. परंतु ह्या खाणींतून निघणारें मॅंगेनीझ उत्तम प्रतीचें नसल्यामुळें त्याला चांगली किंमत येत नाहीं. तथापि मॅंगेनीझ हा धातु महत्त्वाचा असल्यानें त्याला जगाच्या बाजारपेठेंत नेहमींच मागणी असते. म्हणून ह्या खाणींतून निघणाऱ्या मॅंगेनीझचा दर्जा वाढवून त्याला अधिक किंमत मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी ब्यूरो ऑफ माइन्स ह्या संस्थेचें संशोधन चालू आहे. इंडिअन ब्यूरो ऑफ माइन्सचे डेप्युटी डायरेक्टर श्री. बी. जी. देशपांडे कारवार जिल्ह्यांतील खाणींतून काढण्यांत येणाऱ्या मॅंगेनीझच्या मातीचे नमुने गोळा करीत आहेत. कारवार जिल्ह्यांतील सर्व खाणींतून मिळून दरवर्षी सुमारें ५,००० ते ७,००० टन मॅंगेनीझची माती बाहेर काढण्यांत येते. पण ह्या मातींतून मॅंगेनीझचा दर्जा बेताबाताचाच असतो. भारतांत मॅंगेनीझच्या चांगल्या मातीच्या खाणी मध्यप्रदेशांत आहेत. तेथील खाणींतून निघणारें मॅंगेनीझ चांगल्या दर्जाचें असतें. मॅंगेनीझ ह्या धातूचा उपयोग चांगलें पोलाद तयार करण्यासाठी विशेष होतो. म्हणून पोलाद मोठ्या प्रमाणावर निर्माण करणाऱ्या अमेरिकेसारख्या देशांकडून त्याला चांगली मागणी असते. भारताच्या मॅंगेनीझच्या निर्यातीपैकी बरीच मोठी निर्यात अमेरिकेला होत असते. भारतांत पोलाद निर्माण करण्याचे कारखाने जसजसे वाढत जातील त्या मानानें भारतीय मॅंगेनीझला घरचीच बाजारपेठ उपलब्ध होत जाईल. अर्थात, कमी प्रतीच्या मॅंगेनीझवर संस्करण करून तें वापरण्याची शक्यता अजमावण्यासाठी चाललेलें सध्यांचें संशोधन उपयुक्तच ठरेल.

## दि म्हैसूर किर्लोस्कर लि., हरिहर

किर्लोस्कर बंधु लि. च्या मॅनेजिंग एजन्सीच्या व्यवस्थेखालील वरील कंपनीस ३० जून, १९५३ अखेर संपलेल्या वर्षी ११,७२,७२८ रु. ठोक नफा व १,२८,२७४ रु. निव्वळ नफा झाला. ५,२७,०४५ रु. घसारा काढण्यांत आला. भागीदारांना ५% करमाफ डिव्हिडंड मंजूर झालें. गिअर्ड हेड लेथच्या उत्पादनाचे बाबतींत कंपनीनें आणखी प्रगति केली आहे. ८½" सेंटर लेथ "RL" नं. २ चें उत्पादन सुरू झालें आहे आणि त्यांपैकीं कित्येक लेथ सरकारी व रेल्वे वर्कशॉप्सना पुरविण्यांत आले. इतर प्रकारच्या यंत्रसामुग्रीचें उत्पादनहि कारखान्यानें हातीं घेतलें आहे, त्यास सरकारी रेल्वे वर्कशॉप्सचें व खासगी कारखान्यांचें चांगलें गिऱ्हाईक मिळेल.

संक्षिप्त ताळेबंद

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २१,४२,९०० | इमारती | ७,१४,०९८ |
| फंड | ३,८२,७८९ | मशिनरी | २८,६४,४०२ |
| घसारा | ३१,४४,६७४ | स्टॉक-इन-ट्रेड | २७,१२,३४८ |
| कर्जे, ठेवी | १९,०५,०६३ | येणीं | १२,३२,४१७ |

### "किर्लोस्कर न्यूज"

किर्लोस्करांच्या कारखान्यांची माहिती देणाऱ्या ह्या पत्रिकेचा चौथा, १ डिसेंबर, १९५३ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यांत प्रारंभीं डॉ. राधाकृष्णन् ह्यांनीं किर्लोस्करवाडी येथें कामगारांना जो संदेश दिला, तो उद्धृत केला आहे. त्यानंतर हरिहर, पुणें, बंगलोर आणि किर्लोस्करवाडी येथील कारखान्यांच्या प्रगतीची सचित्र माहिती देण्यांत आली आहे. हरिहर येथील कारखान्यांत नव्या लेथचें उत्पादन जोमानें चालू आहे. गोदरेज अँड बॉइस मॅ. कं. लि. ला "RL" नं. १ लेथ पूर्ण समाधान देत आहे. किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि. नें ५ BHP किर्लोस्कर सीरीज II एंजिन हें सुधारलेलें एंजिन बनविण्यास प्रारंभ केला आहे. थिन वॉल बेअरिंगजच्या व बुशेसच्या उत्पादनास कारखान्यानें प्रारंभ करून हिंदी कारखानदारींत नवें पाऊल टाकलें आहे. सध्या हैद्राबाद सरकारची १,००० इंजनांची ऑर्डर पुरी करण्यांत कारखाना गुंतला आहे.

किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं. नें पॉवर आणि डिस्ट्रिब्यूशन ट्रॅन्सफॉर्मर्सचें उत्पादन हातीं घ्यावयाचें ठरविलें आहे. ह्या योजनेप्रमाणें कारखान्यांत दरसाल ५०,००० KVA चें उत्पादन होऊं शकेल व पुढें तें ७५,००० KVA पर्यंत वाढवितां येईल, अशी त्याची उत्पादनक्षमता राहील.

### मध्यभारत स्टेट को. बँक लि.

मध्यभारताच्या सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारनें वरील केंद्रीय बँक दि. २३ रोजीं रजिस्टर केली. बँकेचें सुमारें ५ लक्ष रुपयांचे शेअर्स खपले आहेत. पहिलीं दोन वर्षें दरसाल ५०,००० रु. व पुढें तीन वर्षें दरसाल २५,००० रु. ह्याप्रमाणें राज्य सरकार बँकेला मदत करणार आहे. बँकेची मुख्य कचेरी ग्वाल्हेरला असावी का उज्जैनला असावी, असा वाद गेलीं दोन वर्षें चालू होता. सहकारी तज्ज्ञ व खुद्द रिझर्व्ह बँक यांनीं इंदूर हें ठिकाण मुख्य कचेरीसाठीं सुचविलें होतें. २६ जानेवारी, १९५४ रोजीं बँकेचें उद्घाटन होईल.

### बार्शी लाइट रेल्वे

बार्शी लाइट रेल्वे १ जानेवारी, १९५४ पासून सरकारी मालकीची होईल व सेंट्रल रेल्वेकडे तिची व्यवस्था जाईल.

### दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स

दिल्ली विद्यापीठानें वरील नांवाची संस्था अर्थशास्त्रीय अभ्यास, संशोधन आणि शिक्षण हीं कामें करण्यासाठीं चालविली असल्याचें प्रसिद्ध आहे. संस्थेचा कारभार एका रजिस्टर्ड सोसायटीमार्फत चालतो. भारतामधील सर्व भागांतील असे १४० संस्थापक-सदस्य संस्थेला लाभलेले असून त्यांनीं संस्थेला प्रत्येकीं १,००० रुपये मदत म्हणून दिलेले आहेत. ह्या मदतीचा एक फंडच बनविण्यांत आला आहे. संस्थेनें आतां स्वतःच्या मालकीची इमारत बांधण्याचें ठरविलें आहे. मुख्य इमारतीला लागूनच 'स्वामी विवेकानंद हॉल' नांवाची इमारत बांधण्यांत येणार आहे. संस्थेतील प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी ह्यांना स्वामी विवेकानंदांच्या जीवनापासून स्फूर्ति मिळत असल्यामुळें वरील नांव मुक्रर करण्यांत आलें आहे. इमारत बांधण्यासाठीं लागणारा पैसा छोट्या छोट्या देणग्यांच्या रूपानें जास्तींत जास्त व्यक्तींनीं जमवावा अशी संस्था-चालकांची इच्छा आहे. हा हेतु साध्य करण्यासाठीं असें ठरविण्यांत आलें आहे कीं, कोणतीहि देणगी पांच रुपयांपेक्षा अधिक असूं नये. त्याचप्रमाणें कमींत कमी देणगी एक रुपयापेक्षा कमी असूं नये असाहि निर्णय घेण्यांत आला आहे. म्हणून देणगीच्या पावतीचीं पुस्तकें सुद्धां एक, दोन, तीन, चार व पांच रुपयांचीं काढण्यांत आलीं आहेत. संस्थेचे चालक श्री. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनीं वरील माहिती देणारें पत्रक काढून विवेकानंद हॉलच्या इमारतीसाठीं वर्गणी पाठविण्याची जाहीर विनंती केली आहे. दिल्ली हें राजधानीचें शहर असल्यामुळें महत्त्वाच्या आर्थिक घटनांचा कानोसा प्रथम बहुधा तेथेंच लागतो. अशा ठिकाणीं अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठीं वरील कार्य करीत असल्यानें तिला एक विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. वर्गणी पाठविण्याचा पत्ता "डायरेक्टर, दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, दिल्ली ९" असा आहे.

### हातमागाच्या कापडासाठीं ३० विक्री केंद्रें

मुंबई सरकार हातमागाच्या कापडाच्या विक्रीसाठीं वेगवेगळ्या ठिकाणीं एकूण ३० डेपो उघडणार आहे. प्रत्येक डेपोस व्यवस्था खर्च भागविण्यासाठीं दरसाल ३,३५० रु. मदत दिली जाईल. म्हणजे, सरकार ह्या डेपोंवर दरसाल १ लक्ष रु. खर्च करील. जत्रा व बाजार ह्यांतून हातमागाच्या मालाचा प्रचार करण्यासाठीं तीन फिरत्या मोटारी हिंडत आहेत.

### रीडर्स डायजेस्टची भारतासाठीं स्वतंत्र आवृत्ति

जानेवारीपासून "रीडर्स डायजेस्ट"ची भारतीय आवृत्ति निघूं लागली, म्हणजे त्या मासिकाच्या २९ आवृत्त्या होतील. त्या सर्वांचा मिळून मासिक खप पावणे दोन कोटी प्रती एवढा होईल. हिंदी आवृत्तींत इतर आवृत्तींप्रमाणेंच मजकूर असेल; पण त्यांत हिंदी जाहिराती येतील.

### बँक ऑफ टोकिओची मुंबई शाखा

बँक ऑफ टोकिओची मुंबई शाखा गेल्या आठवड्यांत उघडण्यांत आली. ह्या बँकेच्या जपानमध्यें ४५ व जपानबाहेर ६ शाखा आहेत. याकोहामा स्पीशी बँकेचीं येणीं-देणीं पत्करून व नवें भाग भांडवल उभारून ही बँक १९४६ मध्यें स्थापन झालेली आहे.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।२ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.